जिल्हा परिषद सरळसेवा भरती- २०२३
औषध निर्माण अधिकारी या पदावर
नियुक्ती बाबत.

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**आरोग्य विभाग**
**जिल्हा परिषद आदेश क्र आरोग्य/आस्था-५-६/३०/२०२५**
**दिनांक : १४/०१/२०२५**

वाचा :- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट- ५ मधील ३(दहा)
२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः प्रानिमं १२२२/प्र क्र ५४/का.१३-अ दिनांक ४ मे, २०२२.
३. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०२३/प्र.क्र ११/२०२२/आस्था-८ दिनांक १५ मे, २०२३.
४. जिल्हा परिषद अहमदनगर(अहिल्यानगर) अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक ०१/२०२३
५. आय बी पी एस कंपनी लि. यांचे पत्र दिनांक ०७/०३/२०२४
६. मा उप सचिव, ग्राम विक ास व पंचायत राज विभाग, यांचे पत्र क्र पदभ-३१२४/प्र क्र २५०/आस्था-८,दिनांक ३०/०९/२०२४
७. मा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील मंजूर निवड सूची दिनांक ०९/०१/२०२५

संदर्भ क्रमांक २ ते ३ मधील महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील आदेशानुसार संदर्भ क्र.४ अन्वये जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा सेवा वर्ग-३ औषध निर्माण अधिकारी या पदासाठी सरळसेवा भरती जाहिरात देण्यात आलेली होती. संदर्भ क्रमांक ५ नुसार प्राप्त निकाल तसेच संदर्भ क्रमांक ७ नुसार अंतिम केलेल्या निवडसुचीनुसार औषध निर्माण अधिकारी या पदावर सुधारीत वेतन संरचना एस-१०:२९२००-९२३०० या वेतनश्रेणीमध्ये (अधिक नियमानुसार देय भत्ते) स्थानापन्न नियुक्तीने त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना करणेत येत आहे.

| अ.क्रं | सरळसेवेने नियुक्त केलेल्या उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ज्योती पांडुरंग कावरे | मु.पो.पारनेर,लोणी हवेली रोड, शिवराज हाईटस जवळ पारनेर,ता.पारनेर,जि. अहिल्या नगर | इमाव | इतर मागास वर्ग महिला | प्राथमिक आरोग्य केंद्र कान्हुर पठार ता. पारनेर जि. अहिल्यानगर |

**अटी व शर्ती –**

१. औषधनिर्माण अधिकारी या पदावर केलेली नेमणुक पुर्णतः हंगामी स्वरुपाची असून कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना व कारण न दाखवता जिल्हा परिषद सेवेतून कमी करण्याचा हक्क राखून ठेवला आहे.तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकीय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्तापीत करता येणार नाही.
२. प्रथम नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.
३. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम १९८१ मधील नियम ११ परिशिष्ट ३ मध्ये नमूद केल्यानुसार सदर पदावर रुजू झालेच्या दिनांकापासून दोन महिन्यासचे आत जिल्हा शल्य

चिकीत्सक अहमदनगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैदयकीय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर केले पाहिजे.

४. शासन मान्य संस्थाकडून संगणकाची परिक्षा एम.एस.सी.आय.टी. नियुक्ती मिळाले पासुन दोन वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल त्यानुसार खातेप्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी सदर कर्मचार-यास कार्यमुक्त करावे.

५. महाराष्ट्र शासन साप्रवि कडील क्र.व्हीसीए/१०९३/१४९९/प्रक्र-५९/सोळा-अदि.०९/०३/१९९४ मधील सुचनेनुसार सदरची नियुक्ती "चांगले चारित्र असणे" या अटीवर देण्यात येत आहे. चारित्र्य पडताळणी कार्यालया प्रमुख यांनी सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याची नोंद सेवा पुस्तसका मध्ये घेण्यात यावी. यामध्ये एखादी गंभीर बाब केव्हाही निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

६. आपण विवाहीत असल्यास आपणास एकच पती/पत्नी आहे असे समजणेत येईल. एकापेक्षा अधिक पती/ पत्नी असल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार उमदेवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा नियुक्तांची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल, अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यता प्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे समजण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराने जन्म तारखेचे परिशिष्ठ-५ अ मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड बी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

८. नेमणूक झालेल्या पदावरुन स्थायी झाले नंतरच आंतर जिल्हा बदली करावयाची झाल्यास त्यासाठी शासन निर्णय दिनांक २९ सप्टेंबर २०११ मधील तरतुदीच्या व प्रचलीत शासन निर्णयाच्या अधीन राहुन तसा अर्ज आपणास प्रशासनाकडे करता येईल.

९. खात्याच्या पूर्व परवानगी शिवाय प्रशिक्षण घेता येणार नाही.

१०. उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन या कार्यालयास नेमणुक करणेत आली आहे. त्यासंबंधि कार्यालय प्रमखांकडे दयावे लागेल.मी श्री./श्रीम. ------------------------------राहणार-- -------- प्रतिज्ञापत्र लिहुन देतो की, जिल्हा परिषद सेवेत माझे जिल्हा सेवा वर्ग -३ औषधनिर्माण अधिकारी या पदावर झालेली नियुक्ती हि वेतनबॅड एस -१०: २९२००-९२३०० (अधिक प्रचलित नियमानुसार मिळणारा महागाई भत्ता व इतर भत्ते) यामध्ये पुर्णपणे हंगामी स्वरुपाची असून आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. व नेमणुक कोणतेही कारण अथवा नोटिस न देता संपुष्टात आणण्याचा जिल्हा परिषदेला पुर्ण अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणुक स्विकारीत आहे.

११. सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून तीन महिन्याचे आंत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र वशिअ- /१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक ०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व असेटस एण्ड लायबीलीटीज याबाबतचे विवरणपत्र भरुन दयावे.

१२. सदर पदावर रुजू झाले नंतर जर काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीचा राजीनामा दयावयाचा असेल तर तुम्ही एक महिना अगोदर तशी नोटीस देणे आवश्यक आहे. व नोटीस देणे शक्य नसेल तर नोटीसेपोटी एक महिन्याचा मुळ पगार जिल्हा फंडात भरावा लागेल.

१३. सदर नियुक्ती आदेश दिनांकापासून पदस्थापनेच्या ठिकाणी एक महिन्याचे आत हजर होणे आपणास बंधनकारक राहिल अन्यथा सदरचा नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

१४.आपण सादर केलेल्या कागदपत्राच्या व प्रतिज्ञापत्राच्या आधारे आपणास सदरची नियुक्ती देण्यात येत आहे. सदरची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील आहे.अर्जदाराने सादर केलेले कागदपत्र बनावट अथवा खोटी असल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रदद करण्यात येईल.

१५.सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा नियम शासनाने वेळोवेळी व परिपत्रक यामधील निर्णय/ निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

१६.सदर नियुक्ती संदर्भात भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद अथवा न्यायालयीन वाद उदभवल्यास सदरची नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल.

१७.जिल्हा परिषद सेवेत असतांना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय,धंदा,अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१८.कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत १.गट विमा योजना २.वैद्यकिय दाखला ३.जातीचा दाखला ४.जातीचे वैधता प्रमाणपत्र ५.स्वग्राम घोषणापत्र ६.शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तक भरतांना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वतः करुन घ्यावी.

१९.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणा-या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमदेवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दिनांक २८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणा-या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२०.आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर २०११ नूसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखे पासून सहा महिन्याच्या आत जातपडताळणी समितीकडुन जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा आपली नियुक्ती रद्द केली जाईल.

२१.शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र./घभाम/१००५/प्र.क्र.४६३/पापु १६ दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेबाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्याचेकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाही त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

२२.शासन वित्त विभाग क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा/४, दिनांक ३१/१०२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण/ जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२३.महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्र.क्र./३४/सेवा-४ दिनांक ३१/०३/२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुंटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा निवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२४.उमेदवार औषधशाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषधनिर्माते असावेत.

२५.संबंधित उमेदवाराच्या ताब्यात औषधसाठा असलेने नियमानुसार त्यांचेकडुन जामीन कदबा भरुन घेणे बंधनकारक राहिल.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला असुन त्याचा सांकेतांक क्रमांक .202501141000012 असा आहे.

स्वाक्षरी /-
(आशिष येरेकर,भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

ज्योती पांडुरंग कावरे,
मु.पो.पारनेर,लोणी हवेली रोड, शिवराज हाईटस जवळ पारनेर,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर

प्रत - माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना

१.वैदयकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र **कान्हुर पठार, ता.पारनेर** जि.अहिल्यानगर

२/- संबंधितांस नियमानुसार हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी. तसेच संबंधिताच्या सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी आपल्या स्तरावरुन करावी व त्यानंतरच संबंधीतास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. संबंधीताचा हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर

३. गटविकास अधिकारी/तालुका वैदयकिय अधिकारी पंचायत समिती **पारनेर** , जिल्हा अहिल्यानगर

४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

५. निवड नस्ती

14/1/2025
(डॉ बापुसाहेब नागरगोजे)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**